क्रमांक : व्हीपीएम-२६७४/४५४८३-२४,
ग्राम विकास विभाग, सचिवालय, मुंबई-३२,
दिनांक : २३ ऑगस्ट १९७५.

प्रति,

सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व पंचायत समित्यांचे गट विकास अधिकारी.

विषय :- दलित समाज मोठ्या संख्येने ग्राम सभांना हजर रहाण्याकरिता ग्राम सभेच्या दोन सभांपैकी एक सभा दलित समाजाच्या वाड्यावर घेण्याबाबत सरपंचांना मार्गदर्शन करण्याबाबत.

......

मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ७ अन्वये दरवर्षी किमान २ ग्राम सभा घेतल्याच पाहिजेत अशी कायद्यात तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच नियमाप्रमाणे ग्राम सभा सर्वसाधारणपणे ग्राम पंचायत कार्यालयात किंवा गांव चावडी किंवा चौरा किंवा योग्य अशा सार्वजनिक ठिकाणी घ्यावी लागते. या ग्रामसभेकरिता किमान ७ दिवसांची आगाऊ नोटीस द्यावी लागते व ही नोटीस गावातील उच्च ठिकाणी लावून दवंडीने कळवावी लागते. या तरतूदीवरून दिसून येईल की ग्रामसभेची माहिती देण्याबद्दल संपूर्ण तरतूद नियमांत केलेली आहे. तेव्हां दलित समाज मोठ्या संख्येने या ग्रामसभांना उपस्थित रहावा या उद्देशाने ग्रामसभेच्या दोन सभांपैकी एक ग्रामसभा दलित समाजाच्या वाड्यांवर घेण्यांत यावी असे शासनाचे आदेश या पत्रान्वये कळविण्यांत येत आहेत.

२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व पंचायत समित्यांचे गट विकास अधिकारी यांना विनंती करण्यांत येते की, आपापल्या जिल्ह्यातील व तालुक्यातील सर्व सरपंचांना, वर्षातून घेण्यांत येणाऱ्या २ ग्रामसभांपैकी एक ग्रामसभा दलित समाजाच्या वाड्यावर घेण्यांबाबतची मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात याव्यात.

उप सचिव,
महाराष्ट्र शासन.

प्रत सर्व विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी यांच्या माहितीसाठी अग्रेषित.